नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०३/२०२५ (रविवार) संध्याकाळ**

## अंमलीपदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ,आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०८/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे एनडीपीएस कायदयन्वये कारवाई कामी नेमलेले विशेष पथक पेट्रोलींग करत असतांना त्यांना गुप्त बातमीदार कडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत आरोपी नामे **सानु उर्फ केशव ओमबहादुर थापा, वय २६ वर्ष रा ओमनगर चनकापुर** हा त्याचे ताब्यात अवैध रित्या अमली पदार्थ बाळगुन आहे. मिळालेल्या माहीती आधारे पोलसांनी आरोपीला गाठुन त्याची झडती घेतली असता आरोपी नामे सानु उर्फ केशव ओमबहादुर थापा याचे ताब्यात असलेल्या कापडी थैली गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा ज्याचे निव्वळ वजन १८० ग्रॅम किंमत १८०० रु मिळुन आला. एकुण १८०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सानु उर्फ केशव ओमबहादुर थापा वय २६ वर्ष रा ओमनगर चनकापुर याच्यावर कलम ८(क)२०(ब)(२)(अ)एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करून **आरोपीला अटक करण्यात आली आहे.** सदर गुन्हयाचा पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर